Indira Memorial Educational Institutie's

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Latur

and

IRASG Group of Research Journal

Joint Organized

One Day Multi Disciplinary National Conference

On

# "The Contribution of Social Thinker in India's Sustainable Development in the context on contemporary relevance"

23 April, 2017



Editor

Dr. Balaji G. Kamble

Organized by

Principal

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,

Latur, Dist. Latur (MS)India

Scanned by CamScanner

| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 19 | शाहू महाराजांची आरक्षणाची भूमिका<br>**डॉ. मोहन मिसाळ** | 75 |
| 20 | अस्पृश्यता निर्मूलन आणि राजर्षी शाहू महाराज<br>**सचिन गुंडीराम डेंगळे** | 78 |
| 21 | महात्मा गांधीजी आणि ग्राम स्वराज्य<br>**डॉ. बी.के. शिंदे** | 82 |
| 22 | म. गांधीजीचे स्त्री विषयक विचार : एक अभ्यास<br>**डॉ. व्ही. जी. तांबारे** | 85 |
| 23 | महात्मा गांधी आणि खेडयांची पुनर्ररचना<br>**डॉ. बालाजी कांबळे** | 88 |
| 24 | महात्मा बसवण्णा : एक स्थलकालातील व्यक्तिमत्व<br>**प्रा. डॉ. रत्नाकर लक्षटे** | 92 |
| 25 | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे स्त्रीविषयक विचार<br>**डॉ. सुरेखा वनकर - बादाडे** | 99 |
| 26 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रीय सुरक्षा व परराष्ट्रीय धोरणविषयक विचार<br>**रामकिशन सखाराम आवाड** | 104 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिलाविषयक विचार<br>**प्रा. श्रीराम नरवडे** | 110 |
| 28 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय विवेचन : एक अभ्यास<br>**डॉ. विवेक विष्णुदास जाधव** | 113 |
| 29 | येवला येथील ऐतिहासिक परिषद ते धर्मांतर<br>**सुरेश अं. कातळे** | 120 |
| 30 | समता सैनिक दल<br>**डॉ. शिवाजी गाढे** | 124 |
| 31 | जाती व्यवस्था निर्मुलन विषयक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार<br>**आर. व्हि. घाडगे** | 131 |
| 32 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे बौध्द धर्माविषयी विचार<br>**सोमनाथ व्यंकटी घाडगे** | 135 |
| 33 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार व कार्य<br>**वैशाली भगवानराव सिरसीकर** | 139 |
| 34 | भारतीय युवकांसंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका<br>**प्रा. डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे** | 143 |
| 35 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समकालीन प्रश्न<br>**प्रा. अंगद भोसले** | 146 |


Scanned by CamScanner

# महात्मा बसवण्णा : एक स्थलकालातीत व्यक्तिमत्व

प्रा. डॉ. रत्नाकर लक्षटे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
देगलूर महाविद्यालय,
देगलूर, जि. नांदेड

24

मानवी जीवन अनिश्चित, अस्थिर व क्षणभंगुर आहे.निसर्गाने प्रत्येक व्यक्तिस समान रुपात काही नैसर्गिक देणगी दिली आहे. तरीही प्रत्येकाचा जीवनाकडे पाहण्याचा व जीवन जगण्याच दृष्टिकोन वेगळ आहे. मानवाच्या उत्पत्तीपासून ते आजपर्यंत करोडो व्यक्तिंचा जन्म व मृत्युही झाला. तरी जग सर्वांनाच आठवणीत ठेवते असे नाही. काळाच्या पडद्यावर सर्वांच्याच पाऊलखुणा ठळकपणे उमटत नसतात. इतरांच्या जगण्यात आपल्या जगण्याचा आनंद शोधणारी माणसं तशी फार कमी असतात. परिस्थितीला नामोहरण करुन स्वत:चे नाव काळाच्या पडद्यावर लिहिणारा एक महापुरुष मध्ययुगीन भारतात जन्मास आला. ज्याचे नाव बसवण्णा मादरस हे होते.

या लेखाचा उद्देश बसवेश्वर मादरस हे स्थलकालातीत व्यक्तिमत्व म्हणून का ओळखले जाते ? त्यांच्या व्यक्तिमत्वात प्रेरणादायी ठरणाऱ्या घटना कोणत्या ? बसवेश्वरांच्या व्यक्तिमत्वातून वर्तमान सामाजिक व राजकीय व्यवस्थेत शाश्वत बदल करण्या इतपत कोणकोणते विचार आज प्रस्तुत ठरतात ? हे जाणुन घेण्याचा आहे. महात्मा बसवण्णांचे व्यक्तिमत्व, विचार व कार्य, त्रिकालबाधित सत्य व प्रेरणादायी आहेत. या गृहितकास प्रमाण मानुन हा लेख प्रपंच करण्यात आला आहे.

महात्मा बसवण्णा मादरस यांच्या विचारांस वगळुन भारतीय समाजसुधारणेचा इतिहास अपूर्ण आणि निर्जीव बनेल. भारतीय प्रबोधन व समाजसुधारणेच्या चळवळीला बसवेश्वरांनी विलक्षण आयाम दिले आहे. त्यांनी भारताच्या समतावादी चळवळीच्या इतिहासाला एका युगप्रवर्तक अध्यायाचे विस्मयकारक स्वरुप प्राप्त करुन दिले. त्यांच्याशिवाय परिवर्तनवादी चारित्र्य आणि नैतिकता या सदगुणांचा इतिहास विशाल तेजस्वी अविष्कारापासून वंचित राहील. मध्ययुगीन भारतात जीवन जगण्याच्या प्रक्रियेचा कणा मोडलेल्या आणि प्रस्थापित व्यवस्थेकडून धास्तावलेल्या लोकांना चतुर्वर्णव्यवस्थेच्या विळख्यातून मुक्त होण्याची प्रेरणा दिली. तद्नंतर आधुनिक युगातील वारकरी, फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीतील प्रबोधनाच्या तेजस्वी ताज्यांना गवसणी घालण्यास पोषक वातावरण उपलब्ध झाले.

बसवण्णांनी मंगळवेढ्यातून राजकीय जीवनात प्रवेश केल्यानंतर मध्ययुगीन राजकारणाचे स्वरुप आणि चौकटच बदलून टाकली. तत्कालीन राज्यव्यवस्थेचा उद्देश संपूर्णपणे बदलून समताधिष्ठित समाजाचे ध्येय पूर्ण करण्याच्या दिशेने पाऊल टाकले. त्यांनी जाणले की, प्रस्थापित चालुक्य व कळचुरी राज्यव्यवस्थेची वकिली करुन समता निर्माण करण्याचा मार्ग चोखाळता येतो. परंतू तो शाश्वत नाही. पूर्णत्वाकडे जाणारा नाही म्हणून त्यांनी



Scanned by CamScanner

तो स्विकारला नाही. सदाचारी व कायकनिष्ठ नागरिकच (शरण) प्रबोधनाच्या चळवळीचे निर्माते व समर्थक होऊ शकतात. परंतू हे कार्य तत्कालीन समाजधुरीण किंवा शासनव्यवस्था करु शकणार नाही. कारण जनतेप्रती कल्याणाचा अभाव या शासनात होता. जनप्रबोधन आणि जनकल्याणासाठी जनेतेचे पाठबळ गरजेचे असते. या लोकसहभागीत्वाच्या महात्म्यास जाणून बसवण्णांनी प्रामाणिकपणा व कर्तव्यनिष्ठता यातून जनतेचे पाठबळ मिळविले. त्यासाठी पूरक पर्यायी इष्टलिंग,दासोह, कायक, अनुभवमंटप, आरिवे गुरु या पंचसुत्रीची अंमलबजावणी केली. या चतु:सुत्रीच्या अविष्काराने तत्कालीन बहुजनांना अमृतप्राशन केल्याचे सुख मिळाले.

बागेवाडीत मुंजव्रतबंध संस्कारास विरोध केल्यापासून ते कुडलसंगमाच्या निवासात राहून मिळालेल्या अनुभवातून बसवेश्वरांना कळुन चुकले होते की, धर्मांध पुरोहितव्यवस्था व राज्यव्यवस्थेकडे कितीही याचना केल्यातरी बहुंख्याचे जगणे सुकर होणार नाही. यासाठी त्यांनी योजनाबध्द विचारपूर्वक संसदीय मार्गाने डावपेच आखून बहुजनांना अभिव्यक्ती व जीवन जगण्याचे स्वातंत्र्य बहाल केले. मानवतेचा कळवळा असणारी माणसेच समतावादी चळवळीची खरी ताकद असतात. त्यांना जागृत करुन सुसंघटीत केले तर ते प्रबोधनाचा विचार पुढे नेतील असा विश्वास बसवेश्वरांना होता. धर्मग्रंथ आणि पुरोहितांच्या भोंदुगिरीने ग्रासलेल्या समाजमनाला बसवेश्वरांनी समाजवादी समाजव्यवस्थेचा कृतीशिल कानमंत्र दिला. बसवेश्वरांनी आपल्या कृतितून जाहीर केले की, ज्यांना समाजकल्याणार्थ झटावयाचे आहे त्या प्रत्येकाने परधन व परस्त्रीचा त्याग करावा.

बसवण्णांनी जनसामान्यांचे समाजकारण, धर्मव्यवस्था, अर्थव्यवस्था, ज्ञानव्यवस्था, राजकारण ईत्यादीतील सहभागाच्या वाढी विषयी प्रबोधन केले. खेड्या-पाड्यात, महारवाडा, मांगवाडा, अस्पृश्य वस्ती, गावाकुसाबाहेर व घराघरातील पुरोहितशाहीच्या दहशतीखाली जगणाज्या शुद्रातिशुद्रांना निर्भय बनविण्याचा मार्ग दिला. समाजबांधणी व विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेतले. बसवेश्वरांच्या प्रोत्साहनामूळे व समतावादी आचरणामुळे मागासवर्गीय हरळय्या, मधुवय्या, कक्कय्या, चिक्कय्या इ. जनसामान्यांच्या जीवनात नवा उत्साह संचारला. ज्याचा परिपाक धर्मांध व्यवस्थेला हादरा देणाज्या रोटी-बेटी पध्दतीस व्यवहार्य रुप देण्याचे धाडस करण्यात झाले.

समताधिष्ठित समाज व राजकारणाचे धोरण ठरविताना बसवेश्वरांनी उच्च व नैतिक मानवी मूल्यांचा आग्रह धरला. त्यातून समाज व राजकारणाला नैतिकतेचे अधिष्ठान प्राप्त झाले. बसवेश्वरांच्या धोरणातील संयमी खंबीरपणा पाहून संन्यासी, चोर, दरोडेखोर, अस्पृश्य, ब्राह्मणवादी, राजा-राणी, वेश्या, परितक्त्या यांसह विविध पंथ-संप्रदाय या सर्वांनी स्वत:स अनुभवमंटप संस्कृतीत सामावून घेतले.

समाजसुधारणेची प्रक्रिया राबविण्यासाठी लोकांमध्ये मिसळले पाहिजे. त्यांच्या दु:खमय आयुष्याशी समरस झाले पाहिजे असे महात्मा गांधीजी म्हणत. महात्मा गांधीचा हा विचार बसवेश्वरांनी प्रत्यक्षात उतरवला. जन्माचे व संपत्तीचे वैभव नाकारुन ते रानावनात फिरुन लोकांसोबत चर्चा करत. त्यांच्या प्रश्नांना समजून घेऊन त्यावरील शाश्वत उपाय सांगत. आस्थेने त्यांची विचारपूस करत. सामान्यांना ईश्वर, पाप-पुण्य, स्वर्ग-नरक, दारिद्र्य, अस्पृश्यता, अज्ञान, नैराश्य, कर्तव्यपरायणता, या विषयावर मार्गदर्शन करत. अध्यात्मिक व सामाजिक समता रुजवण्याचा प्रयत्न महामंत्री असून केला. महार, मांग, चांभार, लोहार, सुतार, धोबी, न्हावी यांसह सर्वांना अनुभवमंटपात प्रवेश देवून शाश्वत विकासाच्या प्रक्रियेचे भागीदारी बनवले. तत्कालीन धर्मग्रंथ व उच्चवर्णीयांच्या साखळदंडात बंदिस्त झालेल्या समाजाला बाहेर काढून सदाचार, समता व नैतिकतेवर आधारित शरण धर्मात परावर्तीत केले.

बसवण्णांचा विचार शांततेच्या मार्गाने पर्यायी व्यवस्था उभी करणारा असल्यामुळे तो चिरस्थायी व लोकप्रिय आहे. अस्पृश्यांना माणुस म्हणून जगण्याची ताकद प्राप्त झाली. बसवण्णंनी जनतेला सार्वजनिक व



Scanned by CamScanner

राष्ट्रहितासाठी कायकनिष्ठ व दासोही बनवले. बोलकी समाजसुधारणेची चळवळ उभी न करता तीस कृतीशील बनवले. बोलणे एक आणि आचरण वेगळे न ठेवता आचार व विचारात साम्यता आणली. पृथ्वीवरील प्रत्येक व्यक्तिचे हात Constructive असावेत अशा हातानेच वर्तमान व भविष्यात अच्छे दिन येवु शकतात.

गौतमबुध्दांचा कालखंड कल्पनात्मक, चमत्कारीक, आवडंबरयुक्त, रुढीवादी व दैववादी लिखानात व भाषणत आडकुन पडलेला होता. बसवेश्वरकाळातही साधारणपणे हीच परिस्थिती होती. या परिस्थितीला सत्याच्या सामर्थ्याने आचरणातून उत्तर दिले. वचन साहित्यातून मार्गदर्शन केले. अनुभवमंटप व इष्टलिंगाच्या माध्यमातून जनतेला फार मोठी ताकद दिली. ज्याच्या साह्याने समताधिष्ठित समाजव्यवस्थेच्या निर्मितीत संपूर्ण जगभरातील जतनेला सक्रिय सहभागी होता आले. बसवेश्वरांना व्यवस्था परिवर्तनाच्या वाटेवरुन चालताना अनेकवेळा निराशाजनक अनुभव आले. प्रस्थापित व्यवस्थेने त्यांच्या बदनामीचे कट-कारस्थान रचले. समाज व राष्ट्रनिष्ठेच्या साह्याने आपणास नक्कीच यश आणि ध्येयप्राप्ती होईल असा विश्वास बसवण्णांना होता.

**बसवण्णा आणि अर्थव्यवस्था :-**

महात्मा बसवण्णा जन्मापासून ते अंतापर्यंत जगण्यासाठी लागणाऱ्या सर्व सुखसोयींचा वापर समाजहितासाठी करत होते. स्वतःचे घर अनुभवमंटपासाठी खुले करुन दिले. ज्याप्रमाणे फुल्यांनी स्वतःच्या वाड्यातील विहीर अस्पृश्यांना खुली करुन दिली. बसवेश्वरांना मिळालेले सर्व वैभव वडिलोपार्जित नव्हते. ते तर त्यांनी मुंजव्रतबंध संस्काराच्या समयी सोडले होते. सासज्याकडून व पत्नीमार्फत मिळणाऱ्या संपत्तीचा स्विकार केला नाही. स्वतःचा आर्थिक स्तर स्वतः मेहनत, प्रामाणिकपणा व बुध्दिचातुर्याच्या आधारे सुधारला. इतरांनीही स्वतःचा आर्थिक स्तर याच मार्गाने सुधारावा असा उपदेश केला. बसवणांच्या वचन साहित्याचा अभ्यास केल्यानंतर असे सिध्द होते की, भारतीय नागरिक व समाजाची आर्थिक गुणवत्ता त्यांच्या मार्फत होणाऱ्या कायकातूनच सुधारते. जसे E=MC२ हे जसे त्रिकालबाधित सत्य आहे. श्रमातून उत्पन्न होणाऱ्या सेवा व संपत्तीचे न्याय्य वितरण होणे गरजेचे आहे. तत्कालीन बहुसंख्य जनता ग्रामीण भागात राहत असत. ग्रामीण अर्थकारणास अर्थमंत्री असल्यामुळे अगदी जवळून पाहण्याची संधी बसवेश्वरांना मिळाली होती. या संधीचा सदुपयोग करुन बसवेश्वर मंगळवेढ्यातील पंचक्रोशीत आर्थिक जाणीव जागृत करत असत.

समकालीन अर्थव्यवस्थेतील नुसते दोष दाखवले नाहीत तर त्यात सुधारणा करण्यासाठी उपयुक्त कृती व तत्वज्ञान मांडले. जे आधुनिक युगातील समाजवादी अर्थव्यवस्था व महात्मा गांधीच्या विश्वस्त संकल्पनेशी साधर्म्य साधणारे आहे. बसवण्णांचे दासोहं तत्वज्ञान समाजवादी अर्थव्यवस्था मान्य करते. खाजगी संपत्तीला नाकारुन तिचा वापर समाज कल्याणासाठी करणारी अर्थव्यवस्था रुजवले. दासोहाचे तत्वज्ञान व्यक्तिंची सामाजिक जबाबदारी स्पष्ट करणारे आहे. समाजबांधवाचे हित समाजबांधवानेच करावे त्यासाठी कोणीतरी स्वर्गातून अवतार घेणार नाही. मुळात स्वर्ग ही व्यवस्थाच नाही. ती कायक व दासोहाच्या साह्याने पृथ्वीवर निर्माण करता येते. याची जाण समाजबांधवांना करुन दिली. अर्थमंत्री व महामंत्री पदावर कार्यरत असताना शेततळी, कालवे, बंधारे यांच्या निर्मितीतून जनतेला रोजगार मिळवून दिला. वर्तमानातील जलयुक्त शिवाराची संकल्पना व्यवहारात आणली. रोजगाराच्या माध्यमातून स्वतःचे आर्थिक उत्पन्न वाढते. आपला सामाजिक दर्जा सुधारतो. सामाजिक प्रतिष्ठा वाढते. सामाजिक प्रतिष्ठा व अर्थशास्त्राच्या अतिशय जवळचा संबंध स्पष्ट केला. कायक करणाऱ्यासच अनुभवमंटपात प्रवेश दिला. १,९६,००० जंगमांसाठी दासोह अनुभवमंटपात चालवले. ग्रामिण भागातील आलुतेदारी व बलुतेदारीला प्रोत्साहन दिले. त्यांना त्यासाठी लागणारे कर्ज अर्थकोषातून उपलब्ध करुन दिले. सरंजामी अर्थव्यवस्थेला कल्याणकारी स्वरुप प्राप्त करुन दिले. त्यांनी जगण्यासाठी लागणारी उपजिविका स्वतःच्याच कायकातून



Scanned by CamScanner

मिळवली. राष्ट्रीय संपत्तीचा अपहार केला नाही. गैरमार्गाने संपत्ती कमावली नाही. स्वाभिमानी समाज व त्याची स्वावलंबी अर्थव्यवस्था बसवेश्वरांनी निर्माण केली.उत्पादनातील स्वयंसिध्दता व वितरणातील न्यायपूर्णत: बसवेश्वरांच्या अर्थव्यवस्थेचे लक्षण आहे. प्रत्येकाच्या झोपडीत प्रगतीचा सुर्य व्यवहारात येण्यासाठी प्रयत्न केले. बसवण्णांच्या नजरेत उत्पादनातील स्वयंसिध्दतेसाठी संधीची समानता आवश्यक आहे. उत्पादन हे व्यक्ति व समाजाची गरज लक्षात घेवून व त्याला नवनिर्मितीचे समाधान मिळवून देणारे असावे.

बसवण्णांनी केलेल्या आर्थिक सुधारणा व्यक्तिगत आणि सामाजिक बदल घडवून आणणाज्या होत्या. राज्याची तिजोरी समृध्द करणाज्या होत्या. व्यक्तिच्या गरजेला प्राधान्य देणारी अर्थव्यवस्था असावी न की इच्छेला. बसवण्णांनी जनतेचे संपत्तीविषयीचे आकर्षण व संग्रह प्रवृत्तीस नाकारले. रस्त्याने चालताना पडलेले पैसे ही न उचलणारी शरण संस्कृती उभी केली. गरजपेक्षा अधिक कमवायचेच नाही. कमवले तर ते सरळ महामनेत दासोह करावा. राज्याच्या संपत्तीचे हनन करणार नाही. असा सदाचारी व सद्‌गुणी शरण समाज उभा केला. बसवेश्वरांनी अर्थपुनर्रचनेत श्रीमतं व गरीब यांतील वाद मिटविण्यासाठी समतेचे तत्वज्ञान स्वीकारले. कमावलेल्या संपत्तीत समप्रमाणात वाटणी करुन आर्थिक समतोल साधणे. ज्या उत्पादन पध्दतीने व्यक्तिच्या नैसर्गिक व मानवी अधिकारावर आक्रमण केले. व्यक्तिच्या रोजगाराचा, सपंत्ती कमावण्याचा व तिचा उपभोग घेण्याचा हक्क हिरावून घेतला. त्या अन्यायकारी उत्पादन पध्दतीस विरोध केला. उलट संपत्तीचा उपभोग हा सामाजिक न्यायावर आधारित घ्यावा असा विचार मांडला.

बसवेश्वरांच्या अर्थव्यवस्थेला अध्यात्मिकतेचा स्पर्श होता. लोकांची अध्यात्मिक भूक भागवून त्यांना अर्थव्यवस्था मजबूत करण्याची प्रेरणा दिली. तत्कालीन समाज व राज्यव्यवस्थेने सर्वाच्या कायकाची व्यवस्था केली नव्हती. श्रम अर्थशास्त्र उदयास आले नव्हते. वेठबिगारी पध्दत होती. मनुष्य हा गुलाम आहे. त्याचा विकास करण्यासाठी अर्थशास्त्रीय मदत करणे समाज व राज्यव्यवस्थेचे कर्तव्य आहे. असा विचार बसवेश्वरांच्या व्यवस्थेत होता. बसवेश्वरांनी संपूर्ण अर्थशास्त्रीय संदर्भात बदल केला. उत्पादन पध्दती, वितरण व्यवस्था, श्रम व्यवस्था, संयोजक इ.ला व्यवस्थापनशास्त्राचे संदर्भ जोडले. नियोजन व कौशल्यप्रधानतेतून अर्थशास्त्र सुधारता येते हे दाखवून दिले. त्यामुळेच तर बिज्जल बसवेश्वरांच्या समाजसुधारणेच्या कार्याला प्रोत्साहन देतो.

**धर्म व राजकारण :-**

महात्मा बसवण्णांच्या जीवनातील प्रमुख कार्यक्षेत्र धर्म व समाजसुधारणा हे जरी असले तरी त्यांनी अनेक धार्मिक जाणिवांचा शिरकाव राजकारणात केला. परंतू तो समाज कल्याणार्थ होता न की आजच्याप्रमाणे स्व व पक्षहितार्थ बसवण्णांच्या धर्मविषयक संकल्पना पोथिनिष्ठ वैदिक धर्मास नाकारणाज्या होत्या. मानवीय सुधारणा करून धर्मनिरपेक्ष जाणीवा विकसित करणाज्या होत्या. बसवण्णांच्या धर्माधिष्ठीत राजकारणाला मानवतावादी स्वरुप होते. मानवी जातीच्या शाश्वत कल्याणाचा विचार अनुभवमंटपात मांडला. त्यास पुरक कृती महामंत्री पदावर राहून केली. त्यामुळे तत्कालीन अनेक संप्रदाय व धर्माचे लोक चळवळीत सहभागी झाले. बवेश्वरानंतरच्या काळात पंढरपूर परिसरात जी वारकरी चळवळ स्थिरावली त्याचे मुळ शरण चळवळीत आहे.

बसवेश्वर रुढअर्थाने सर्वसंग परित्याग करुन एकांतवासात जाऊन स्वत:ची मुक्ती करुन घेणारे नव्हते. बसवेश्वर हे समाजनिष्ठ सुधारक होते. मानवाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर समाजातच आहे. त्यासाठी संसार सोडून हिमालयात जाण्याची गरज नाही. आपल्यांत असलेल्या ईश्वरांची प्रत्येकाने स्वत: व दुसज्यांप्रति नतमस्तक होवून पूजा करावी. यासाठीच शरणू शरणार्थ ही अभिवादनाची प्रथा रुढ केली. सत्य हाच ईश्वर हा गांधीचा विचार १२ व्या शतकात रुढ केला. याची प्रचिती अनुभवातूनच सिध्द होते. अनुभव मानवी जीवनाला परिपक्व बनवते. म्हणून



Scanned by CamScanner

बसवेश्वर अनुभवाच्या सिध्दतेतून प्रसिध्द होणाज्या अनुभवमंटपाची स्थापना करतात. यांतील चर्चेतून धर्म-अधर्म, सत्य-असत्य, नैतिक-अनैतिक यांच्यातील चिरंतनता सिध्द होते. मानवी शक्तीला जर नैतिकतेचे पाठबळ नसेल तर तिचा विनाश झाल्याचे ऐतिहासिक दाखले देतात. उदा : रावण, कंस ई. बसवेश्वरांच्या बचनांचा अंतिम संदेश हिंसा नसून अहिंसा व सत्य आहे. बसवेश्वरांनी सांगितलेला लिंगायत धर्म हा मानवता आणि सहिष्णूतेच्या मुल्यांवर विणलेला एक वैश्विक पोत आहे. जो अनुभवांच्या चौकटीत राहून बांधलेला आहे. धर्माधिष्ठित कर्मठपणा व संकुचित प्रादेशिकता नाकारणारा आहे. धर्माचे नाव घेवून नैतिकतेचे उल्लंघन करणाज्या सर्वांना बसवेश्वर धिक्कारतात. आपापल्या धर्माचे श्रेष्ठत्व सांगणारे विवेकशून्य बनले.

नैतिक तत्वज्ञान आणि राजकारण यांचे नाते राजकारणाच्या व्यावहारिक चौकटीत बसवणे खूप कठीण आहे. तत्वज्ञ आणि धर्मचिंतक लोभ आणि महत्वाकांक्षा यांचा वारा लागू नये म्हणून राजकारणापासून अलिप्त राहतात. राजकारणात महत्वकांक्षेची फार मोठी भूमिका असते. महात्मा बसवेश्वर हे देव व धर्म यावर निष्ठा ठेवणारे तत्वज्ञ होते. त्यांच्या दृष्टीने धर्म म्हणजे दया, सत्य, शुध्द व विवेकी बुध्दीने केलेले कायक. मानवाचा मानवावरील विश्वास व अनुभव हेच प्रेम आणि सत्य आत्मसात करण्याचा उचित मार्ग आहे. बसवेश्वरांच्या काळात राजकारण आणि धर्म यांतील दूरावा दूर करणे फार कठीण होते.

**दारिद्र्याची कारणमीमांसा :-**

महात्मा बसवेश्वरांच्या मते दारिद्र्य, गरिबी समाजातील वैगुण्य आहे. दारिद्र्य मानव निर्मिती आहे. ईश्वरनिर्मिती नाही. समाजातील गावकुसाबाहेर किंवा गावात राहणारा दारिद्र्याने खितपत पडलेला कोणताही मनुष्य समाज आणि राज्यव्यवस्थेच्या धोरण निर्धारण आणि त्यांच्या अंमलबजावणीतील दोषामुळे दरिद्री बनवतो. तत्कालीन धर्ममार्तंड राजा सरंजामदार, पुरोहित या सर्वांना कल्पना होती की, समाजातील अनेक लोकांना पुरेसे अन्न मिळत नाही तरी ते त्यांच्याकडून देव-धर्माच्या नावाने पाप-पुण्य, मोक्ष, सुख यांच्या आशेने व भयाने अनाठायी खर्च करायला लावतात. कर्जबाजारी बनवतात. देवी कर्मकांडाच्या नावाखाली भरमसाठ दक्षिणा लुटतात. मंदीर बांधणीचा निधी घेतात. मरीआईला बकरे कापण्यासाठी कर्ज देतात. जनतेला दरिद्री बनवणाज्या वर्तनाची व धर्ममार्तंडाच्या धार्मिक वाक्चातुर्य (पोपटपंचीस) बळी पडण्याची व पाडण्याच्या क्रियेची चिकित्सा वचन साहित्यातून केली.

सावकारी, दलाली, देव, धर्म, कर्मकांड इत्यादीच्या माध्यमातून कमावलेला पैसा लोकांच्या शोषणातून मिळवलेला असतो. गरीब, असहाय, अबला लोकांच्याविषयी काळजी करुन बसवेश्वरांनी त्यांना दारिद्र्यातून बाहेर पडण्याचा शाश्वत आधार दिला. दारिद्र्य ही सामाजिक व मानसिक विकृती आहे. मानवाने मानवावर केलेला अन्याय आहे. पशु, पक्षी अन्नाचा एक कण दिसता आपल्या सगे सोयज्यांना बोलावतात. परंतू मनुष्य मात्र त्यावर आपली मालकी सांगुन इतरांचे जीवनत्व नाकारतो असा विलक्षण फरक दोघांत का जाणवतो ? असा प्रश्न उभा करून त्याचे उत्तर माणसांच्या स्वार्थी, संग्रही प्रवृत्तीत आहे. यांचा शोध बसवण्णा घेतात. समाजातील कौशल्यवान, क्षमतावान लोकांना आपल्या पायावर उभा टाकण्याची हिंमत व संधी बसवण्णांनी दिली. वैदिक धर्मग्रंथात, मंदिरात, दगडाच्या मुर्तीत देव नाही. जीवंत माणसांत देवत्व पाहून त्याचे दारिद्र्य नष्ट करण्यासाठी समाजाने प्रयत्नशील असणेच शिवाची पूजा केल्यासारखे आहे हे बसवण्णा सांगतात. तत्कालीन समाजावर अधिक पगडा असणारे वेद, आगम, शास्त्र, पुराण इ. धर्मग्रंथांकडून भुकेल्या माणसांची आध्यात्मिक, बौध्दिक भुक भागवण्याची शक्यता नाही तसे सामर्थ्य किंवा ज्ञान त्यात नाही. त्या ग्रंथांना व्यक्तिच्या अनुभवाचा आधार नाही. ते अपौरुषेय काल्पनिक आहेत. समाजात दुफळी माजवणारे आहेत. त्यामुळे बसवेश्वरांनी दारिद्र्याच्या संकल्पनेचे मुळ व्यक्तिच्या



Scanned by CamScanner

मनात अनादीकाळापासून घर करुन बसलेले धर्मग्रंथ, त्यांतील सिध्दांत व त्या सिध्दांताचे पारायण करणाऱ्या व त्यांच्या रचनेगामील अमानवीय हेतूत मानले. जो ग्रंथ गरिबी हटवण्याचा मार्ग न सांगता ती वाढवतो. जो गुरु भक्ताला अधिक गरीब होण्याचा कानमंत्र देतो. ज्या सामाजिक रुढी, परंपरा, संस्था, ग्रंथ व गुरुंचे बटीक आहेत. त्यासही बसवेश्वरांनी नाकारले.

दारिद्र्याने ग्रासलेला एक चोर जेंव्हा बसवण्णांच्या घरातून त्यांच्या पत्नीचे दागिने चोरी करतो तेंव्हा बसवण्णा त्यास पकडल्यानंतर शिक्षा न करता त्याचे प्रबोधन करतात. हृदय परिवर्तन करतात. दरोडेखोरांचे मन परिवर्तन करून त्यास शरण बनवतात. जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले । तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ॥ या संत उक्तीप्रमाणे बसवेश्वरांनी आपली सर्व कार्यशक्ती, राजशक्ती, अर्थशक्ती व बौध्दिक चातुर्यपणाला लावुन समाजाला दुःख मुक्त केले. त्यासाठी कर्ज देणे, कर्ज माफ करणे, अन्नछत्र चालवणे, आयोग बसवणे, निरर्थक चर्चा करणे, अहवाल बनवणे, कागदोपत्री घोडे चालवणे, आर्थिक मदत जाहीर करणे या सारख्या साधनांचा सदैव वापर केला नाही. तर प्रत्येकास उद्योगी बनविले. उद्योगी बनविण्यातील अडचणी दूर करण्यास समाजास प्रेरित केले. सामाजिक सहभाग व गुंतवणुक वाढवली.

समताधिष्ठित समाजाची स्थापना करण्याचा बसवेश्वरांचा निर्धार दृढ आणि अविचल होता. भारतीय समाजातील शोषित जनतेचे कधीही भरुन न येणारे शोषण करणारी वैदिक समाज व्यवस्था टिकून राहणे त्यांना सहन होत नव्हते. वैदिक व्यवस्थेने समाजाला अधिक कमकुवत बनविले. भारताची अर्धी जनता अर्धपोटी होती. दिवसेंदिवस अर्धमेल्या अवस्थेकडे वाटचाल करत होती. बसवेश्वरांना दुःख होत होते की, वैदिक व्यवस्था ही मनुस्मृती व इतर ग्रंथप्रणित कायद्याच्या माध्यमातून भारतीय समाजाला अतिशय अपमानजनक वागुणक देत होती. या भावनेतूनच त्यांनी वैदिक समाज व शासनाविरुध्द आंदोलन उभे केले. आदर्श राज्य, आदर्श नागरिक, धर्मनिरपेक्षता, स्त्री सबलीकरण इ. तत्वांचा स्विकार केला. महात्मा बसवेश्वरांची मनाची अशी पक्की धारणा झाल्यामुळेच समकालीन समाज व्यवस्थेच्या विरोधात बंड करतो आले. त्यातील समविचारी लोकांचे संघटन केले. आपल्या विचार व कार्यास विरोध करणाऱ्यांचे हृदय परिवर्तन करुन आपल्या कार्यात सहभागी करुन घेतले. प्रज्ञा, करुणा, शील, सत्याग्रह, नैतिकता इ. तत्वांच्या पूर्तीचे अहिंसा, सत्य, विवेक, ज्ञान हे साधन होऊ शकते. व्यवस्था परिवर्तनाचा मार्ग रक्तरंजित असावा हे त्यांना मान्य नव्हते. अहिंसा हे बसवेश्वरांच्या जगण्याचे पहिले कलम होते. लिंगायत विचारधारेचा तो आधार आहे. त्यामुळेच वर्तमानात लिंगायत समाजबांधव कोणत्याही समाज हिंसक घटनांमध्ये सहभागी नसतो. त्याचे हात सदैव समाज बांधणीच्या कामात अग्रेसर असतात.

बसवेश्वरांनी मानवतावादी मार्गाने करावयाचे अनेक उपक्रम जनतेसमोर ठेवले. त्यामुळेच बसवेश्वर संपूर्ण मानवजातीचे अविवाद्य व सर्वोच्च नेता बनले. प्रस्थापित रुढीं व कर्मकांडाविरुध्द त्यांच्या कृतियोजनांमुळे बऱ्याचवेळी शरण आश्चर्यचकित झाले. तर इतर अनेकजण आकृष्ट झाले. तरीही त्यांनी ज्या तऱ्हेने उपक्रमाची रचना केली आणि लोकांना त्या कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी स्वतःभोवती जमा केले. हे पाहून तत्कालीन वैदिक व सरंजामी व्यवस्थेचे हस्तक थक्क झाले. बसवेश्वरांच्या व्यवस्था परिवर्तनाचा प्रत्येक मार्ग विचारपूर्वक व उत्तरोत्तर सुधारणावादी सहज आणि मुल्याधिष्ठित होता.

बसवेश्वरांकडे परिस्थितीनूरुप आपला तोल सांभाळण्याची क्षमता होती. ज्याचा प्रत्यय हरळय्या-मधुवरसाच्या मुला मुलींचा विवाह आणि अर्थकोषाची विज्जलाकडून झालेल्या तपासणीच्या प्रसंगातून आपणास येतो. मी बलदेवांचा जावाई किंवा बिज्जलाचा भावजी आहे म्हणून त्याचा गैरवापर करण्याचा विचारही त्यांच्या मनाला कधी स्पर्श केला नाही. बसवेश्वरांनी मुंजव्रतबंध संस्कारास विरोध करून गृहत्याग केल्यानंतर कुडलसंगम येथे इ



Scanned by CamScanner

ानार्जन करताना आपला संकल्पाचा आराखडा मनात तयार केला. सावधगिरी व जबाबदारीने मंगळवेढा व कल्याणमधील निवासातून त्यास कृतीत उतरवले. परंतू ते करताना परिणामाचा विचार केला नाही. बसवेश्वरांनी व्यवस्था परिवर्तनाच्या दिशेने केलेली प्रत्येक कृती प्रथम आपल्या जीवनात अनुसरली. आपल्या अनुभवविश्वाला सक्षम बनवले. त्यास प्रथम आत्मसात करुन, त्याद्वारे स्वतःला जाणून, समजून घेतले. नंतर ते समाजासाठी सांगितले.

महात्मा बसवेश्वरांचा गांधीप्रमाणेच स्वतःच्या आंतरआत्म्याच्या आवाजावर विलक्षण विश्वास होता. या आतल्या आवाजानेच त्यांना समाज परिवर्तनाचे स्थलकालातीत व शाश्वत असणारे मार्ग सुचवले. या सर्वमार्गाचे अनुकरण त्यांच्यासह अनेकांनी केले. या सर्वमार्गाच्या अंमलबजावणी प्रक्रियेत शरणानुभवातून सुधारणा केली. या सर्वांवर वैदिकांनी टीका व विरोध केला. बसवेश्वरांनी सामुदायिक निर्णयावर विश्वास ठेवून मतभेदाच्या हक्काला मान्यता दिली. यातूनच प्रत्येक निर्णय अनुभवमंटपातूनच घेतला. उदा : आंतरजातीय विवाह. बसवेश्वर शरण चळवळीचे नेते व प्रणेते असले तरी त्यांनी स्वतःला जे योग्य वाटले ते केले असे नाही. त्यांचे धोरण व विचार सर्वार्थाने बिनचूक असू शकत नाही हे त्यांना माहित होते. त्यामूळे ते इतर शरणांबरोबर अनुभवमंटपात आपली बाजू मांडून चर्चा करत असत. महात्मा बसवेश्वरांची काही मते मुंजव्रत बंध संस्काराच्या वेळी सनातन्यांना पटली नाहीत. परंतू कालांतराने सनातन्यांना बसवेश्वरांच्या विचाराची पताका हातात घ्यावी लागली.

महात्मा बसवेश्वरांना अजून बरेच काही करायचे व सांगायचे असताना त्यांचा अंत झाला. तरीसुध्दा ते आपले संपूर्ण जीवन स्थलकालातीत स्मरण ठेवण्यासारखे एका महान योध्दयाप्रमाणे जगले. आज त्यांच्या नीतीचे चिंतन व अनुकरण करुनच व्यवस्था परिवर्तनाचा विचार करावा लागतो. बसवेश्वरांचा अंत म्हणजे दृष्टता आणि सृष्टता यांतील एक ताणतणाव होता. धर्म आणि राजकारणातील संघर्ष होता. ज्या सामान्य लोकांजवळ विचार करण्याची क्षमता नाही, असेलच तर ती व्यक्त करण्याची संधी नाही. अशा लोकांच्या ह्रदयात व्यष्टी व समष्टी कल्याणाची प्रेमज्योत पेटविली.

## संदर्भ सुची :-

१) २० व्या शतकातील समाजसुधारणेचा इतिहास - संपादक - प्रा.व्ही.बी.पाटील-के.सागर प्रकाशन, पुणे.

२) क्रांतीकारी युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर-प्रा.डॉ.अशोक मेनकुदळे-महाराष्ट्र बसव परिषद, भालकी.

३) समग्र क्रांतीप्रवर्तक महात्मा बसवेश्वर-संपादक-बस्वराज स्वामी, अमृता प्रकाशन लातूर.

४) विचारवंत आणि समाज-संपादक डॉ.अशोक चौसाळकर-द युनिक अकॅडमी, पुणे.

५) गांधी, आंबेडकर, दलित एवं सामाजिक न्याय-डॉ.बबीता वर्मा, अविष्कार पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स, जयपूर.

६) मध्ययुगीन संत साहित्य : कांही आयाम-डॉ.यू.म.पठाण-स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद.

७) जगतज्योती बसवेश्वर-डॉ.सुर्यकांत घुगरे-महाराष्ट्र बसव समिती, नांदेड.



Scanned by CamScanner